महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १०

# महाराजा सयाजीराव आणि विठ्ठल रामजी शिंदे

## पवन साठे




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १०

# महाराजा सयाजीराव
# आणि
# विठ्ठल रामजी शिंदे

पवन साठे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि विठ्ठल रामजी शिंदे
इतिहास
पवन साठे
●
प्रकाशन क्रमांक - ३०
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : पवन साठे
वारणा बझार समोर, घुणकी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
४१६११२
मो. ७८८७३३२२२२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# आणि
# विठ्ठल रामजी शिंदे

महाराजा सयाजीराव यांनी भारताच्या सर्वांगीण आधुनिकीकरणाचा पाया घातला. कारण त्यांनी एका विशिष्ट क्षेत्रातच काम केले असे नाही. त्याचप्रमाणे फक्त आपले बडोदा संस्थान डोळ्यासमोर  ठेवूनही काम केले नाही. ते जरी बडोदा संस्थानचे राजे असले तरी जगातील प्रमुख आणि प्रगत राष्ट्रांशी फक्त आपल्या संस्थानाचे नाही तर देशाची तुलना करत जगातल्या प्रतिष्ठित राष्ट्रांमध्ये आपल्या राष्ट्राचा समावेश होण्यासाठी जे करायला हवे ते सर्व करण्याकडे त्यांचा कल होता. धर्म आणि जात याबाबी आपल्या राष्ट्राच्या प्रगतीतील सर्वांत मोठे आव्हान आहे हे ओळखणारे ते पहिले भारतीय प्रशासक आहेत. कारण १८८१ ला राज्यकारभार हाती घेतल्यानंतर आणि प्रामुख्याने १८८७ च्या पहिल्या परदेश प्रवासानंतर त्यांचे तुलनात्मक चिंतन या दिशेने विकसित होत गेले.  १९०९ मध्ये महाराजांनी लिहिलेल्या 'The Depressed Classes' या निबंधात त्यांनी 'अस्पृश्यतायुक्त भारत

म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या' हा सिद्धांत मांडला. अस्पृश्यतेला राष्ट्रीय प्रश्न मानणारे ते पहिले राज्यकर्ते आहेत. या सर्व तपशिलांच्या पार्श्वभूमीवर एक समाज क्रांतिकारक म्हणून जेव्हा आपण त्यांचा विचार करतो तेव्हा एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत प्रस्थापित होतो तो म्हणजे ते प्रतिक्रियावादी समाजक्रांतिकारक नव्हते तर समाजाची रचनात्मक पुनर्बांधणी करणारे सर्जनशील समाजक्रांतिकारक होते. कारण धर्म आणि जात यातून निर्माण झालेली अमानवी विषमतेला द्वेषमूलक प्रतिक्रिया देण्यामध्ये त्यांना रस नव्हता. तर या विषमतेची वैज्ञानिक पद्धतीने दखल घेत ती बदलण्यासाठी धर्म साक्षरता अभियान त्यांनी राबविले. त्यांच्या या अभियानाला तुलनात्मक धर्मचिंतनाचा भक्कम पाया होता. महाराजा सयाजीराव आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्यातील नाते वरील तपशिलांच्या आधारे विचारात घेतले तर त्यातील रचनात्मक द्रष्टेपणा लक्षात येईल. सयाजीरावांनी शिंदेंना त्यांच्या एल.एल.बी. शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली तशीच मंचेस्तरच्या तुलनात्मक धर्म अभ्यासासाठी आर्थिक मदतही केली. शिंदेंना अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामाची पहिली प्रेरणा महाराजांनी दिलीच; परंतु त्यांच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनला भक्कम बौद्धिक आणि आर्थिक पाठबळ दिले. महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलन हा विषय त्यांच्या राज्याच्या प्रशासकीय धोरणाचा भाग म्हणून स्वीकारला. तर विठ्ठल रामजी शिंदे यांनी

याच धर्तीवर भारतात पहिल्यांदा अस्पृश्यता निर्मूलनाचा राष्ट्रीय प्रश्न संस्थात्मक प्रयत्नातून हाताळला. म्हणूनच या दृष्टिकोनातून सयाजीराव आणि शिंदे यांच्यातील नाते समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

## सयाजीरावांची शिष्यवृत्ती

२३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील जमखंडी येथे जन्मलेल्या विठ्ठल रामजी शिंदे यांचे शिक्षण गंगारामभाऊ मस्के यांच्या डेक्कन मराठा असोसिएशन आणि सयाजीराव महाराज या दोघांच्या शिष्यवृत्तीवर झाले. ज्या डेक्कन मराठा असोसिएशनने पहिल्या टप्प्यात शिंदेंना शिष्यवृत्ती दिली त्या संस्थेला सयाजीरावांनी १८८५ ते १९३९ अशी ५४ वर्षे अखंडपणे आर्थिक पाठबळ दिले. ही मदत ५ लाख २९ हजार ५५६ रु. इतकी होती. आजच्या रुपयाच्या दरात या रकमेचे कमीतकमी मूल्य ७२ कोटी ४५ लाखांहून अधिक होईल. बाबासाहेबांप्रमाणेच अगदी पदवी शिक्षणापासूनच अप्रत्यक्षपणे महाराजांची मदत शिंदेंना मिळाली. परंतु गंगारामभाऊ म्हस्केंची शिष्यवृत्ती पुरेशी नसल्याने बी. ए. पदवी शिक्षण खर्चाच्या विवंचनेत असणाऱ्या विठ्ठल रामजी शिंदेंनी १८९६ मध्ये लक्ष्मणराव माने व खासेराव जाधव यांच्या मदतीने सयाजीरावांची भेट घेतली. या भेटीत सयाजीरावांनी त्यांना दरमहा २५ रु. स्कॉलरशिप मंजूर केली. ही स्कॉलरशिप देताना शिक्षणपूर्तीनंतर विठ्ठल रामजी शिंदेंनी

बडोद्यात नोकरी करावी अथवा स्कॉलरशिपची रक्कम परत करावी अशी अट त्यांना घालण्यात आली. सयाजीरावांनी ही स्कॉलरशिप दिल्यानंतर डेक्कन मराठा असोसिएशनकडून शिंदेंना दिली जाणारी १० रु. ची मदत बंद करण्यात आली. सयाजीरावांनी विठ्ठल रामजी शिंदेंना पदवी आणि एल.एल.बी. शिक्षणासाठी ५ वर्षे एकूण सुमारे १,५०० रु.ची मदत केली.

## ऑक्सफर्ड येथील तुलनात्मक धर्म शिक्षणाला आर्थिक साहाय्य

सयाजीरावांनी शिंदेंना ऑक्सफर्ड येथील तुलनात्मक धर्म अभ्यासासाठी जाण्यासाठी आणखी मदतीची आवश्यकता होती. त्यासाठी शिंदे महाराजांच्या भेटीला गेले. यासंदर्भात शिंदे म्हणतात, '... मी बडोद्यास महाराजांकडे गेलो. भेट झाली. महाराज खरे दिलदार, ते हसून म्हणाले "काय शिंदे, आमच्या पैशांची काय वाट?" मी अत्यंत नम्रपणाने उत्तर केले, "महाराज, पत्करलेले कार्य ईश्वराचे आहे आणि ते आपल्यास पसंत पडण्यासारखेच आहे. धर्मसुधारणा, समाजसुधारणा इत्यादी प्रागतिक गोष्टीच बाळकडू आपण आजपर्यंत पुष्कळच पाजीत आलेले आहात. आता तर विलायतेतील युनिटेरियन समाजाने माझा अर्ज पसंत केल्यावर ही चालून आलेली संधी आपण दवडणार नाही अशा भरवशावरच आपणांकडे आलो. मला प्रवासास लागणारे सुमारे दीड हजार रुपये जर आपण कृपाळूपणे द्याल तर अर्थातच माझे दीड हजार रुपयांचे ऋण फिटले

असेच मी समजेन.” ऋण फेडण्याचा हा अजब प्रकार पाहून दयाळू महाराज हसले आणि म्हणाले, “बरे आहे. शिंदे, तुम्ही यशस्वी होऊन या!” आधीची स्कॉलरशिप देताना घातलेली बडोद्यातील नोकरीविषयीची अट बाजूला ठेवून पुन्हा १,५०० रु. प्रवास खर्च यावेळी महाराजांनी दिला. शिंदे ऑक्सफर्डहून परतल्यानंतर तेथील मँचेस्टर कॉलेजच्या धर्तीवर विशिष्ट महाविद्यालयाची स्थापना शिंदेंनी करावी अशी महाराजांची इच्छा होती. त्यानुसार शिंदेंनी तसा आराखडादेखील केला होता. यासंदर्भात शिंदेंनी नोंदविलेला अनुभव महत्त्वाचा आहे. शिंदे लिहितात, ‘ऑक्सफर्डच्या मँचेस्टर कॉलेजच्या ह्या विश्वधर्माच्या अध्ययनाप्रीत्यर्थ बडोदा संस्थानात एक विद्यालय असावे असा महाराजांचा फार दिवसांचा मनोदय होतो. मागे जेव्हा जेव्हा ते मुंबई-पुण्यास येऊन मला भेटण्यास बोलवित तेव्हा तेव्हा हा विषय काढून महाराज माझ्याशी विचारविनिमय करीत आणि ह्या कामासाठी मी बडोद्याला येऊन राहावे अशी इच्छा प्रदर्शित करत. पण माझ्या इतर कार्यबाहुल्यामुळे आजवर ते शक्य झाले नव्हते. आता पुन्हा तोच विषय काढून, ह्याविषयी एखादी निश्चित योजना तयार करून देण्याचे महाराजांनी मला सांगितले. मी त्यांना काही टिपणे लिहून दिली. तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी तीन व्यवस्थित योजना मागितल्या एक साधी आणि कमी खर्चाची, दुसरी त्याहून अधिक खर्चाची, पण अधिक तपशिलाची तिसरी पद्धतशीर मँचेस्टर कॉलेजसारख्या एखाद्याच कॉलेजची.’

परंतु काही कारणाने ही योजना पूर्णत्वास जाऊ शकली नाही. यामध्ये सामाजिक कार्य करण्यासाठी जाणीवपूर्वक मनुष्यबळ तयार करण्याचा महाराजांचा उद्देश होता. महर्षी शिंद्यांप्रमाणेच श्रीधर व्यंकटेश केतकर आणि बाबासाहेब आंबेडकर यांनाही शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बडोद्यात नोकरी न करण्याचा पर्याय स्वीकारण्याबरोबरच त्यांच्यावर झालेला शिक्षणाचा खर्च माफ करण्याचा उदारपणा महाराजांनी दाखवला होता हे विसरता येणार नाही.

## शिंदेंची बडोदा भेट

विठ्ठल रामजी शिंदे परदेशाहून परत येण्याआधी सयाजीरावांनी त्यांना पत्राद्वारे भारतात आल्यानंतर सर्वप्रथम आपली भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे भारतात आल्यानंतर ऑक्टोबर १९०३ मध्ये शिंदेंनी बडोद्यात सयाजीरावांची भेट घेतली. सयाजीरावांनी त्यांना बडोद्यातील अस्पृश्यांसाठीच्या शाळांची तपासणी करून सूचना करण्यास सांगितले. त्याप्रमाणे विठ्ठल रामजी शिंदेंनी या शाळांची तपासणी करून प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी पारंपरिक उद्योगधंदे करण्यास नाखूश असल्याने त्यांना नोकऱ्या उपलब्ध करून देण्याची सूचना मांडली. या सूचनेवरील सयाजीरावांची प्रतिक्रिया सांगताना शिंदे म्हणतात, “धोरणी महाराजांनी लोकमत अनुकूल नसल्याने तूर्त हे शक्य नाही असे सांगितले; पण स्कॉलर्शिपा देऊन पुढील शिक्षणाची सोय करण्याचे कबूल केले आणि त्याप्रमाणे तशी व्यवस्था पण

झाली.” त्यावेळी अस्पृश्य उद्धारासाठी सयाजीरावांनी राबवलेले शैक्षणिक उपक्रम पाहून ते इतके प्रभावित झाले की, ब्राह्मो समाजाच्या कामाबरोबर त्यांनी देशपातळीवर अस्पृश्य उद्धाराची संस्थात्मक चळवळ उभी करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले.

## बहिष्कृत भारत – बडोद्यातील भाषण

पुढे ४ वर्षांनंतर १९०७ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात न्यायमंदिराच्या दिवाणखाण्यात विठ्ठल रामजी शिंदेंचे ‘अस्पृश्योद्धार’ या विषयावरील भाषण आयोजित केले होते. ते भाषण ‘बहिष्कृत भारत’ या मथळ्याखाली ‘मनोरंजन’ मासिकाच्या डिसेंबर १९०८ च्या अंकात प्रकाशित झाले. पुढे महाराजांच्या आज्ञेने हेच व्याख्यान‘बहिष्कृत भारत’ या स्वतंत्र पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले. पुढे २० वर्षांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘बहिष्कृत भारत’ याच नावाचे पाक्षिक १९२७ मध्ये सुरू केले. तर डॉ. आंबेडकरांच्या १९३६ मधील ‘Annihilation Of Caste’ या जगप्रसिद्ध भाषण-निबंधाची पूर्वतयारी ठरणारा सयाजीरावांचा ‘The Depressed Classes’ हा ऐतिहासिक इंग्रजी निबंध १९०९ मध्ये ‘Indian Review’ या मासिकाच्या डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यावेळी बाबासाहेब पदवीच्या दुसऱ्या वर्षात शिकत होते. विठ्ठल रामजी शिंदेंच्या ‘बहिष्कृत भारत’ या पुस्तिकेच्या एक हजार प्रती महाराजांनी विकत घेऊन बडोद्यात वाटल्या. हा विठ्ठल रामजी शिंदेचा या

विषयावरील पहिला मराठी निबंध होता. हा निबंध म्हणजे पुढे शिंदेंच्या 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' (१९३३) या प्रश्नाची समाजशास्त्रीय चर्चा करणाऱ्या मराठीतील पहिल्या ग्रंथाचा पाया होता. दुर्दैवाने महाराजांच्या अन्य कार्याप्रमाणे ही कृतीसुद्धा दुर्लक्षित राहिली.

## अस्पृश्योद्धार – पहिले संस्थात्मक काम

संपूर्ण भारतात सर्वप्रथम विठ्ठल रामजी शिंदेंनी अस्पृश्योद्धाराचे संस्थात्मक काम उभे केले. विशेष म्हणजे बाबासाहेबांच्या अगोदर शिंदेंनी देशपातळीवर सुरू केलेल्या या कार्यामागे सयाजीरावांची प्रेरणा होती. सयाजीरावांनी बडोद्यात अगदी १८८२ पासून सुरू केलेले काम अभ्यासण्याची संधी महर्षी शिंद्यांना १९०३ मध्ये मिळाली. हा अनुभव त्यांना या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून देणारा ठरला. एका अर्थाने विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनातील हा सर्वांत महत्त्वाचा 'टर्निंग पॉइंट' होता. या संदर्भात शिंदे आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, "१८९१-९२ साली बडोदा, अमरेली, पाटण आणि नवसारी येथे प्रत्येक ठिकाणी अस्पृश्य मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे काढून त्यांच्या जेवणाची व राहण्याची सोय केली गेली. कपडेलत्ते, पाट्यापेन्सिली वगैरेही पुरविली. ह्यानंतर कित्येक वर्षे ह्या प्रयोगाला दुष्काळ व प्लेग ही विघ्ने आली. ... तरी देखील महाराजांनी खर्चात बचत न करता बडोदे भागात रु. ४० च्या व इतर भागात रु. २५ च्या शिष्यवृत्त्या ठेवल्या व कसेही

करून १९०० सालापासून पुढे काही वर्षे शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या १०० पासून १५०० पर्यंत राहील असे केले. एकंदरीत ह्या थोर पुरुषाच्या अंत:करणात ह्या हतभागी लोकांचा ध्यास सतत लागला होता, हे माझ्या ध्यानात येऊन चुकले. इतकेच नव्हे तर या महत्त्वाच्या विषयासंबंधी माझ्या स्वत:च्या विचारांना नवीन प्रोत्साहन मिळून ब्राह्मोसमाजाच्या अखिल भारतातील माझ्या प्रचारकार्याबरोबर ह्या लोकांची निरनिराळ्या प्रांतातील स्थिती स्वत: डोळ्याने नीट निरखून अजमाविण्याची मला प्रेरणा झाली." शिंदे यांनी केलेल्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या ऐतिहासिक कार्याची प्रेरणा सयाजीरावच होते याचा पुरावा हे स्वगत देते.

## अस्पृश्योद्धार – सयाजीरावांचे भक्कम पाठबळ

विठ्ठल रामजी शिंदेंच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याला सयाजीरावांनी सातत्याने सक्रिय पाठिंबा दिला. १९०४ मध्ये मुंबई येथे भरलेल्या राष्ट्रीय कॉँग्रेसच्या अधिवेशनात सामाजिक परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते. याच परिषदेत रामकृष्ण भांडारकरांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या धर्म परिषदेसाठी विठ्ठल रामजी शिंदेंनी सयाजीरावांना निमंत्रित केले होते. १९०९ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे सेक्रेटरी असणाऱ्या भारतीय एकेश्वरी धर्म परिषदेच्या लाहोर अधिवेशनास सयाजीरावांनी आपला प्रतिनिधी पाठवला होता. १९१४ मध्ये शिंदे जागतिक एकेश्वरवादी धर्म परिषद घेण्याच्या प्रयत्नात होते. त्यावेळी त्यांनी

महाराजांची भेट घेऊन चर्चा केली. त्यावेळी महाराजांनी शिंदेंना या परिषदेसाठी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. परंतु याच वेळी पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाल्याने ही परिषद झाली नाही. २३ व २४ मार्च १९१८ रोजी विठ्ठल रामजी शिंदेंनी मुंबई येथे भरवलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते. या परिषदेत भारतातील पहिला अस्पृश्यता निवारण ठराव मांडला होता. या ठरावावर उपस्थित मान्यवरांपैकी शंभरहून अधिक लोकांनी सह्या केल्या. त्यामध्ये पहिली सही करणारी व्यक्ती सयाजीराव गायकवाड होते.

## डिप्रेस्ड क्लासेस मिशन

विठ्ठल रामजी शिंदेंनी स्थापन केलेल्या 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेचीदेखील सयाजीरावांनी सातत्याने खंबीर 'पाठराखण' केली. सप्टेंबर १९०९ मध्ये डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या पुणे शाखेच्या शाळांच्या बक्षीस समारंभाला अध्यक्ष म्हणून उपस्थित राहिलेल्या सयाजीरावांनी या संस्थेला १,००० रु.ची देणगी दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम २७ लाख ७२ हजार रु. हून अधिक भरते. या कार्यक्रमानंतर पुणे येथील महार समाजाचे प्रमुख पुढारी रा. शिवराम जानबा कांबळे व रा. श्रीपतराव थोरात या दोघांना सयाजीरावांनी बडोद्यास खास आमंत्रित केले. बडोदा भेटीवेळी त्यांचा योग्य सत्कार करून राजमहालात सयाजीरावांनी त्यांच्याबरोबर आपल्या टेबलावर

सहभोजन केले. तर १८ ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबई येथील डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या वाढदिवस समारंभाचे सयाजीराव अध्यक्ष होते. यावेळी महाराजांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनला २,००० रु.ची देणगी दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ५५ लाख ४५ हजार रु. हून अधिक भरते. या देणगीच्या व्याजातून डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या शाळांतील विद्यार्थ्यांना 'दमाजीराव गायकवाड स्कॉलरशिप फंड' या नावाने शिष्यवृत्त्या चालू करण्यात आल्या. त्याचबरोबर सयाजीरावांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या वसतिगृहातील रा. भटकर नावाच्या महार विद्यार्थ्याला मॅट्रिक परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर कॉलेजातील पुढील शिक्षणासाठी दरमहा २५ रुपयांची स्कॉलरशिप दिली. विठ्ठल रामजी शिंदेंच्या अस्पृश्योद्धाराच्या संस्थात्मक कार्याला सयाजीरावांचा असलेला भक्कम पाठिंबा यातून अधोरेखित होतो. विशेष बाब म्हणजे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्याला १९०६ पासून प्रार्थना समाजानेसुद्धा सक्रिय पाठिंबा दिला होता.

## विठ्ठल रामजी शिंदे आणि राष्ट्रीय काँग्रेस

१८८५ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने भारताच्या सामाजिक-राजकीय परिवर्तनात कळीची भूमिका बजावली. १९१५ मध्ये आफ्रिकेतून भारतात आलेल्या महात्मा गांधींनी काँग्रेसच्या माध्यमातून अस्पृश्यता निवारणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले हे आपण जाणतोच. परंतु महात्मा गांधींच्या या प्रयत्नांना पूरक पार्श्वभूमी शिंदेंनी आधीच तयार करून ठेवली

होती. राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न हाती घ्यावा यासाठी विठ्ठल रामजी शिंदेंनी १९०७ पासून राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात ठराव मांडण्याचा प्रयत्न केला होता. १९०७ ते १९१७ या दहा वर्षांतील शिंदेंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नानंतर १९१७ च्या कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास करण्यात आला. राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निवारणाचे कार्य हाती घ्यावे यासाठी तब्बल १० वर्षे विठ्ठल रामजी शिंदेंनी केलेल्या 'धडपडी'चेच हे फलित होते.

## कायदेमंडळाच्या निवडणुकीत खासेरावांची मदत

१९२० साली मुबंई इलाख्याच्या कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर झाल्या. पुण्यातील मराठा समाजाच्या दोन गटांनी एकत्र येऊन समाजाचा एक प्रतिनिधी म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांना उभे राहावे, असे खासेराव जाधव आणि समाजाच्या प्रमुख पुढाऱ्यांना वाटू लागले. वि.रा. शिंदे मराठा समाजाचे असले तरी अस्पृश्य समाजासाठी फार मोठे काम करत होते. त्याचसोबत शेतकरी, कामकरी, स्त्रिया या मागास बहुजन मंडळींबद्दलही त्यांना कणव होती. यातून वि.रा. शिंदे यांनी 'बहुजन पक्ष' म्हणून आपला जाहीरनामा आपले मित्र खासेराव जाधव यांच्या मदतीने तयार केला. खासेराव दोन महिन्यांसाठी या निवडणुकीच्या निमित्ताने पुण्यात येऊन राहिले. एवढेच नाहीतर वि.रा. शिंदे यांच्या या निवडणूक खर्चाची स्वतः जबाबदारी खासेरावांनी

स्वीकारली. इथे येताना ते खर्चासाठी रक्कम घेऊनच आले. विठ्ठल रामजी शिंदे यांना पाठिंबा देण्यासाठी मराठा समाजच्या मंडळाची खासेराव जाधव यांच्या अध्यक्षेखाली भवानी पेठेत एक सभा झाली. या सभेत न.चिं. केळकर यांनी भाषण केले. ते म्हणाले, 'माझे आई-वडील शेतकरी होते. आपण मराठा पत्राचे संपादक आहोत म्हणून मराठाच आहे.' केळकरांच्या भाषणांचा वृतांत छत्रपती शाहू महाराजांनी वाचला आणि वि.रा. शिंद्यांना लागलीच त्यांनी पत्र लिहिले. आपण पुणे शहरातर्फे निवडून यावे अशा शुभेच्छाही दिल्या. परंतु शाहू महाराजांचे या निवडणुकीत शिंद्यांना साहाय्य मिळाले नाही. मराठा समाजाचे पुण्यातील दोन्ही गट एकत्र यावेत म्हणून खासेराव जाधवांनी खूप प्रयत्न केला; पण एका बैठकीत मराठा मंडळी एक दुसऱ्यावर धावून जाऊ लागली. मारामारी होऊन डोकी फुटली. या भांडणाऱ्या मंडळीपुढे खासेराव हात जोडून म्हणत होते, 'भांडणं आणि आपल्याचं माणसांचे पाय ओढून शत्रू पक्षास मदत करणं हा आपल्या समाजास शेकडो वर्षांचा शाप आहे. आता तरी डोळे उघडा. असे भांडल्याने मतलबी माणसं फायदा घेतात.' आपल्या जवळच्या माणसाचं भलं होऊ नये, याच विचारांनी मराठा समाज दुभंगत गेला. खासेराव जीवाचे रान करून विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रचारासाठी रात्रंदिवस पुण्यात घरोघर फिरून विनवणी करत होते. खासेराव यांनी मात्र स्वतः हजारो रुपये

खर्च करून विठ्ठल रामजी शिंदे यांच्याबद्दल प्रेम दाखवले. स्वतः कष्ट उपसले.' समाजात पडलेली फूट कामी आली. वि.रा. शिंदे यांना निवडणुकीत अपयश आले. मराठा समाजासाठी वणवण करणाऱ्या खासेराव जाधवांना खूप दुःख झाले.

## शिंदे आणि कोसंबी

विठ्ठल रामजी शिंदेंनी अशीच महत्त्वपूर्ण भूमिका धर्मानंद कोसंबी यांच्या आयुष्यामध्ये बजावली. महाराष्ट्रातील बौद्ध धर्म आणि पाली भाषेच्या प्रसारात धर्मानंद कोसंबी यांचे स्थान अनोन्य आहे. कोसंबी १९१२ मध्ये अमेरिकेतून परतल्यानंतर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये नोकरी करावी अशी विठ्ठल रामजी शिंदे यांची इच्छा होती. शिंदेंनी धर्मानंदांची शिफारस करून फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर केशवराव कानिटकर यांना पत्रही लिहिले. त्यानंतर कोसंबींनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये पाली भाषेचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. कारण त्यादरम्यान पुण्यात पाली भाषेच्या प्रसारासाठी ही चांगली संधी असल्याने त्यांना शिंदेंची कल्पना आवडली होती. त्यामुळे कोसंबींना ही नोकरी मिळवून देण्यामध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांची महत्त्वाची भूमिका होती हे स्पष्ट आहे. कोसंबींच्या विनंतीवरून १९१२ मध्ये सयाजीरावांनी फर्ग्युसन कॉलेजमधील पाली भाषेच्या विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला १५ रु.च्या २ आणि १० रु. च्या

२ अशा एकूण ४ शिष्यवृत्त्या सुरू केल्या. या शिष्यवृत्त्यांमुळेच फर्ग्युसन कॉलेज पाली भाषा सुरू करू शकले. महाराष्ट्रातील बौद्ध धर्म आणि पाली भाषा प्रसाराचा हा इतिहास आज आपण समजून घेणे आवश्यक आहे.

## श्रीमंत सयाजीराव गायकवाड पुरस्कार

संस्थानातील जनतेचे विविध विषयांचे आकलन परिपूर्ण व्हावे या उद्देशाने ग्रंथ निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या सयाजीरावांनी अनेक लेखकांना राजाश्रय दिला. बडोद्यातील 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड पारितोषिक समिती'च्या वतीने नोबेल पुरस्काराच्या धर्तीवर भारतातील लेखक आणि समाजसेवकांना पुरस्कार दिला जात होता. या पुरस्काराच्या मानकऱ्यांनी बडोद्यात एक आठवडा येऊन संस्थानचे पाहुणे म्हणून राहावे आणि एक-दोन व्याख्याने द्यावीत असा नियम होता. १९३२-३३ साली १,००० रु. रोख रकमेचा हा पुरस्कार विठ्ठल रामजी शिंदेंना देण्यात आला. याच वर्षी एक वर्षासाठीची तैनात म्हणून दरमहा १०० रु. असे वार्षिक १,२०० रु. व पुरस्काराचे १,००० रु. असे एकूण २,२०० रु. महर्षी शिंदेंना यावेळी मिळाले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४७ लाख ५८ हजार २६९ रु. इतकी भरते. पुरस्कार स्वीकारण्यासाठी बडोद्यास गेल्यानंतर शिंदेंनी 'अस्पृश्यतेचा प्रश्न' आणि 'समाजसुधारणा' या विषयांवर ३ व्याख्याने दिली. यातील १८ जानेवारी १९३३ रोजी बडोदा कॉलेजच्या हॉलमध्ये झालेल्या पहिल्या व्याख्यानाला सयाजीराव उपस्थित होते.

विठ्ठल रामजी शिंदे यांचे जातधर्मविषयक संशोधन आणि अस्पृश्यता निवारणासाठीच्या सामाजिक पातळीवरील संस्थात्मक कार्याचा विचार करता २५ ते २७ डिसेंबर १९३४ दरम्यान बडोद्यात भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र या सत्राचे अध्यक्ष म्हणून त्यांची झालेली निवड सार्थ ठरते.

## शिंदे आणि मंदिर प्रवेश

२० व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेली पंजाबराव देशमुखांच्या नेतृत्वाखालील अमरावती येथील अंबाबाई मंदिर (१९२७) व डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील पर्वती टेकडी (१९२९) आणि काळाराम मंदिर (१९३०) प्रवेशासाठीची आंदोलने महाराष्ट्रभर गाजली. परंतु १९२४ मध्ये त्रावणकोर संस्थानातील व्हायकोम येथे विठ्ठल रामजी शिंदेंच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंदिर प्रवेशाच्या आंदोलनाबाबत पुरोगामी महाराष्ट्र 'अज्ञानी' राहिला. याउलट महाराजा सयाजीरावांनी १८८३ मध्येच आपले खासगी खंडेरायाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले होते. १९२५ मध्ये सयाजीरावांनी अमरेली येथील सार्वजनिक मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. तर १९३२ मध्ये महाराजांनी कोणत्याही आंदोलनाशिवाय बडोदा संस्थानातील सर्व सरकारी मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. मंदिर 'प्रवेशा'चा हा अज्ञात इतिहास आजच्या समाजाने समजून घेतला तर अस्पृश्यता निर्मूलन चळवळीविषयीचे आकलन अधिक परिपूर्ण होण्यास मदत

होईल. कोणत्याही आंदोलनाशिवाय जनतेला मंदिर प्रवेशाचा हक्क बहाल करणाऱ्या सयाजीरावांनी सातत्याने आपल्या भाषणांमधून धर्म आणि जात यांच्या वस्तुनिष्ठ आकलनाची आवश्यकता स्पष्ट केली. यासंदर्भातील अनेक ग्रंथांचे अनुवाद व स्वतंत्र ग्रंथ लेखन यासाठी अगदी १८९५ पासून सयाजीराव प्रयत्नशील होते. याबाबत विठ्ठल रामजी शिंदेंनी नोंदवलेली एक आठवण खूपच बोलकी आहे. शिंदे म्हणतात, 'आर्य-द्रविड-वाद या संशोधन विषयाकडे माझे लक्ष लागले होते. इंदूर, बडोदा वगैरे संस्थानातून आणि म्हैसूर वगैरेच्या युनिव्हर्सिट्यातून कागदपत्रांचा पुरावा मिळवून हिंदुस्थानच्या पुरातन इतिहासाची सामग्री मिळवण्याचा प्रयत्न चालला होता. त्या वेळी बडोदा येथे एक साहित्य संमेलन झाले. त्याला हजर राहून श्रीमंत सयाजीराव महाराजांची मी प्रत्यक्ष भेटही घेतली होती. मी बडोद्यास कायमचा जाऊन राहत असेन तर बडोद्याची मोठी सेंट्रल लायब्ररीच नव्हे तर संस्थानचे सर्व नवे-जुने कागदपत्र शोधून पाहण्याचा पूर्ण अधिकार महाराजांनी मला देऊ केला होता.' भारतात तोपर्यंत जाती प्रश्नावर फारसे संशोधन झाले नव्हते. या पार्श्वभूमीवर जातीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर संशोधन करू पाहणाऱ्या शिंदेंना संपूर्ण सहकार्याच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्याचे सयाजीरावांचे धोरण आज स्वतःला 'संशोधनाची केंद्रे' संबोधणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.

## अस्पृश्योद्धार – सयाजीरावांना अग्रक्रम

श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या मराठी ज्ञानकोशासाठी १९२३ मध्ये लिहिलेली 'अस्पृश्यता निवारणाचा भारतीय इतिहास' नोंद हे विठ्ठल रामजी शिंदेंचे अत्यंत महत्त्वाचे लेखन आहे. या नोंदीत त्यांनी संपूर्ण भारतातील अस्पृश्यांच्या खानेसुमारीचा आधार घेऊन आधुनिक काळातील अस्पृश्यता उद्धाराची पूर्वपीठिका वस्तुनिष्ठपणे मांडली आहे. या नोंदीत भारतातील अस्पृश्योद्धाराच्या कामाचा इतिहास सांगताना शिंदेंनी महात्मा फुले, शशिपाद बंडोपाध्याय यांच्यानंतर तिसरा क्रमांक महाराजा सयाजीराव गायकवाड यांना दिला होता. हा क्रमांक कालानुक्रमे होता. ही दखल घेत असताना सयाजीरावांच्या कार्याच्या परिणामकारकतेबाबत शिंदे म्हणतात, 'कार्याच्या प्रमाणाच्या व सिद्धाच्या दृष्टीने पाहताना वरील दोघांपेक्षा महाराजांचे काम इतके विस्तीर्ण व परिणामकारक झाले आहे की, या तिघांच्या कार्याची तुलना करणेच व्यर्थ आहे.' भारतातील अस्पृश्यता निवारणविषयक कार्याला सयाजीरावांनी वेळोवेळी केलेल्या मदतीविषयी शिंदे 'कृतज्ञ' होते. सयाजीरावांनी स्वत:च्या संस्थानात अस्पृश्यता निवारणासाठी केलेले प्रयत्न आणि भारतभरातील व्यक्ती आणि संस्थांना केलेले साहाय्य यांचे महत्त्व विठ्ठल रामजी शिंदेंनी आपल्या नोंदीत अचूकरीत्या अधोरेखित केले आहे. सयाजीरावांच्या अस्पृश्यता निवारण कार्याच्या गौरवार्थ १९२१ मध्ये परोपकारी सभा व आर्य

समाजाने अस्पृश्यांसाठीच्या कार्यासाठी सयाजीरावांना 'पतितपावन' ही पदवी दिली. ९ फेब्रुवारी १९३३ रोजी बडोदा येथे म्युनिसिपॅलिटीतर्फे देण्यात आलेल्या मानपत्र समारंभात सयाजीरावांनी अस्पृश्यतेची उत्पत्ती आणि तिचे स्वरूप यावर भाषण केले. १९३७ मध्ये लंडनमधून प्रकाशित झालेल्या आणि ऑक्सफोर्ड विद्यापीठाने सयाजीराव महाराजांच्या हयातीत प्रकाशित केलेल्या चरित्र ग्रंथाचे लेखक स्टेनले राईस यांच्या 'हिंदू कस्टम्स अ‍ॅण्ड देअर ओरिजीन्स' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत सयाजीरावांनी अस्पृश्यतेला आपल्या 'प्रगतीच्या इतिहासावरील डाग' म्हटले आहे. राईस यांनी हा ग्रंथ महाराजांना अर्पण केला आहे. आपल्या कारकीर्दीत सयाजीरावांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेला हा 'अनोखा' सन्मान होता. अस्पृश्योद्धारासाठी राबणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्थांप्रमाणेच विठ्ठल रामजी शिंदे यांच्या एकूण सार्वजनिक जीवनात सयाजीरावांनी केलेली 'पाठराखण' ही वटवृक्षाच्या 'आश्वासक' सावलीसारखी होती. सयाजीरावांचे स्वत:च्या आयुष्यातील स्थान अधोरेखित करताना विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, "मी महाराजांकडून उपकृत झालेला मनुष्य आहे. आजकाल भरत खंडात अस्पृश्यता निवारणार्थ चळवळ देशभर फोफावली आहे, तिची पाळंमुळं आणि धुरा महाराजांच्याच खांद्यावर आहे. अस्पृश्य उद्धाराची हिंदुस्थानातील मुहूर्तमेढ ह्या खंबीर पुरुषाने धडक्यासरशी जी रोवली तिचा पुढे विस्तार होत

गेला.” सयाजीरावांनी पुरवलेल्या खंबीर पाठिंब्यामुळे विठ्ठल रामजी शिंदे आपले अस्पृश्यता निवारणासाठीचे संस्थात्मक कार्य उभा करू शकले. त्यामुळेच १९३३ मध्ये विठ्ठल रामजी शिंदेंनी स्वतःचा ‘भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न’ हा महत्त्वपूर्ण ग्रंथ कृतज्ञतापुर्वक सयाजीरावांना अर्पण केला होता.

## बडोद्यात दुसरे व्याख्यान

डिसेंबर १९२९ मध्ये बडोद्यातील सहविचारिणी सभेने शिंदेंनी बडोद्याला येऊन व्याख्यान द्यावे अशी त्यांना विनंती केली. त्यानुसार रविवार, २९ डिसेंबर १९२९ रोजी सायंकाळी ६ वाजता जयसिंगराव स्टेट लायब्ररीमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचे व्याख्यान झाले. हे व्याख्यान ‘तौलनिक भाषाशास्त्र’ या विषयावर झाले. या व्याख्यानाचा तपशील वर्तमानपत्रातून वाचून महाराणी चिमणाबाई यांनी शिंदेंना भेटीसाठी बोलावले. यावेळी रशियातील कम्युनिझम या विषयावर त्यांच्यात विस्तृत चर्चा झाली. शिंदेच्या आणि चिमणाबाईंच्या भेटीचा हा पहिलाच प्रसंग होता.

१० जानेवारी १९३० मध्ये सयाजीराव युरोप दौऱ्यावरून परतले होते. यानंतर महाराजांनी शिंदेंना बडोद्यात २-३ व्याख्याने देण्यास सांगितले. त्यानुसार २२ जानेवारी १९३० रोजी लक्ष्मीविलास पॅलेसच्या दरबारहॉलमध्ये ‘Study of Universal Religion’ या विषयावर शिंदेंचे व्याख्यान झाले. या व्याख्यानासाठी दरबारचे सर्व लहानमोठे अधिकारीदेखील उपस्थित होते.

धर्म आणि जात चिंतन केंद्रस्थानी ठेवून महाराजा सयाजीराव गायकवाड आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्यातील अनुबंध आजपर्यंत तपासले गेले नाहीत. या अनुषंगाने वरील चर्चा विचारात घेता अस्पृश्योद्धाराच्या कामात शिंदेंनी फुल्यांच्याही अगोदर सयाजीरावांना का स्थान दिले होते हे लक्षात येईल. विठ्ठल रामजी शिंदेंना सयाजीरावांची प्रेरणा आणि साथसंगत मिळाली नसती तर त्यांच्याकडून अस्पृश्योद्धाराचा राष्ट्रीय कार्यक्रम निर्माण झाला नसता. परिणामी डॉ. आंबेडकरांच्या जातीअंताची चळवळ एवढी गतिमान झाली नसती. थोडक्यात, वरील चर्चेवरून हा निष्कर्ष अपरिहार्यपणे निघतो.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते

२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील

३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील

४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील

५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर

६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम

७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे

८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे

९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे

१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे

११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील

१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील

१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर

१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे

१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे

१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम

१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे

१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम

१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम

२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे

२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम

२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम

२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर

२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम

२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे

२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर

२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर

२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर

२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड

३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड

३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम

३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील

३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड

३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड

३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे

३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे

३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे

३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील

३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड

४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



❒ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com